FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला. प्र. विभाग पहिली खबर क्र. FIR No. ०६/२०१९ वर्ष Year २०१९ दिनांक Date २४/०१/१९

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार ............, तारीख पासून ०८/०१/१९, वेळ ............, तारीखे पर्यंत १०/१/१९, वेळ ............
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ०९/०१/२०१९, वेळ १३.३० वा
   Information received at P.S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ४४/२०१९, तारीख २४/०१/१९, वेळ १७.४५ वा.
   General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : समक्ष, लेखी / तोंडी Written / Oral तोंडी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ५ कि.मी. पश्चिमेस चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. —
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव लोकमान्य टिळक म.स. रुग्णालय (सायन हॉस्पिटल), शीव, मुंबई ठिकाणाचे नंबर ............ गल्ली ............ रस्त्याचे नाव ............
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ............, गाव ............, पोस्ट ............, तालुका ............, जिल्हा ............, राज्य ............
   Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव —, तालुका —, जिल्हा —, राज्य —
   In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name गिरीश राठोड (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name जगजीवन राठोड
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३७ वर्षे (d) राष्टीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८३३५३२७०२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of Issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation नोकरी
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste मेघवाळ, जनजात Sub-Caste —
   (h) पत्ता : Address : ............ गल्ली / सर्वे नं. Ward ............ घर / नाव नंबर House/Name No. ............ फोन /मो. नंबर Phone/M. No. ............ पॅन नं. Pan No. ............ वोटर्स नं. Card No. ............
   नवनिर्मिती सोसायटी, ए/२ बिल्डींग, ७वा माळा, रु. क्र. ७१४, महालक्ष्मी
   रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............
   एस.के. राठोड मार्ग, महालक्ष्मी (पश्चिम), मुंबई ४०००३४
   तालुका Taluka ............ जिल्हा Distt. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   हाटे, क्लार्क, लोकमान्य टिळक म.स. रुग्णालय (सायन हॉस्पिटल), शीव, मुंबई
   (पूर्ण नाव माहित नाही)

क

फिर्यादी श्री. गिरीश जगजिवन राठोड, वय-३७ वर्षे, रा.ठि. नवनिर्माण सोसायटी, ए/२ बिल्डींग, ७ वा माळा, रु.क्र. ७१४, महालक्ष्मी एस.के.राठोड मार्ग, महालक्ष्मी (प), मुंबई-३४ यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच प्रथम खबरी म्हणून संबोधण्यात येत आहे.

**समक्ष**

**(रणजित पठारे)**
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ............ —
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ............ —
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ............ —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

वा/न तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी श्री. गिरीश जगजीवन राठोड यांचा धुलाई भत्ता व धाण भत्ता मिळण्यासाठीचा अर्ज मंजूरीसाठी पुढे पाठविण्याकरीता आरोपी लोकसेवक हाटे, क्लार्क यांनी फिर्यादी यांचेकडे दुसऱ्यास पैसे द्यावे लागतील असे सांगून स्वत:करीता रु. १,०००/- इतक्या लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले म्हणून गुन्हा कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये नोंद

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

............ —

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

............ —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................. Rank................. No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............................ (3) Transferred to P.S ............................, District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... रणजित पठारे
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि., मुंबई
तपासिक अं. चा कोड. क्र. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...... २४/०७/२०१८
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ............................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्याद                    दिनांक-- २४/०१/२०१९

श्री. गिरीश जगजीवन राठोड, वय--३७ वर्षे, धंदा-- सफाईगार (लोकमान्य टिळक म.स. रूग्णालय, मुंबई) रा. ठि. नवनिर्माण सोसायटी, ए/२ बिल्डींग, ७ ला माळा, रू.क्र. ७१४, महालक्ष्मी एस.के. राठोड मार्ग, महालक्ष्मी, पश्चिम, मुंबई-- ४०० ०३४. मुळ गाव डेडाण, ता. खांभा, जिल्हा अमरेली राज्य गुजरात, आधार क्र. :-- ३१९८ २३३४ ८४४९

........

मी, वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह गेल्या ०६ वर्षापासून रहावयास आहे. माझे सोबत माझी आई, बहिण ,भाऊ व त्यांची मुले असा परिवार आहे.

मी लोकमान्य टिळक म.स. रूग्णालय, शिव (सायन हॉस्पीटल), मुंबई येथे २६.१०.२०१५ मध्ये सफाईगार म्हणून नोकरीस रूजू झालो आहे. मी नोकरीस लागल्यापासून मला धुलाई भत्ता व घाण भत्ता मिळालेला नसल्याने मी ऑगस्ट २०१८ मध्ये सदरचे भत्ते मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यावेळी मला परमनंट नंबर आला नसल्याने माझे भत्त्याचे व इतर काम हे क्लार्क श्री.शाम यांचेकडे होते.

माझेपेक्षा कनिष्ठ असणारे सफाईगार यांनी माझे अर्जाचे नंतर ऑगस्ट २०१८ मध्ये ५ ते ६ दिवसां नंतर अर्ज केल्यानंतर त्यांना धुलाई भत्ता व घाण भत्ता एक ते दोन महिण्यांमध्ये मिळण्यास सुरवात झाली, परंतू मी त्यांचे अगोदर नोकरीस लागूनही मला अर्ज करूनही भत्ते मिळाले नाहीत. माझे पेक्षा कनिष्ठांना सदरचे भत्ते मिळाल्याचे मला समजल्याने मी क्लार्क शाम यांना त्या बाबत विचारणा केली असता त्यांनी ४ ते ५ महिण्यांत भत्ते येतील असे मला सांगितले. त्याप्रमाणे मी एक दोन महिने वाट पाहीली परंतू माझे भत्त्याची रक्कम आली नाही.

मला डिसेंबर २०१८ मध्ये माझा परमनंट नंबर आला. त्यावेळी संबंधित क्लार्क हाटे (पुर्ण नांव माहीत नाही) यांना माझा वॉशिंग भत्ता व घाण भत्ता अद्याप मला मिळालेला नसल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला नव्याने अर्ज करून त्यास जुना अर्ज व सोबत नेमणूक पत्र जोडून डिस्पॅच करण्यास सांगून डिस्पॅच केल्यावर तो अर्ज माझेकडे येईल असे सांगून त्यांनी मला येऊन भेटण्यास सांगितले.

मी दुसरे दिवशी दिनांक ०८.०१.२०१९ रोजी नविन अर्ज करून त्यास नेमणूक पत्र व ऑगस्ट २०१८ मध्ये केलेला जुना अर्ज जोडून डिस्पॅच केला व क्लार्क हाटे यांना भेटण्यास गेलो तेव्हा त्यांनी मला ५ ते ६ महिने काम होण्यास लागतील असे सांगितले. परंतू जर पुढच्या महिन्यात म्हणजेच जानेवारी २०१९ मध्ये भत्त्यांची रक्कम पाहीजे असल्यास रू. १,०००/-- ( रू. एक हजार फक्त ) इतकी रक्कम दयावी लागेल असे सांगून ते त्यांच्या माणसाकडून काम करून घेतील असे सांगितले. परंतू माझे काम हे क्लार्क हाटे यांचेकडेच असल्याने व तेच माझे काम करणार असल्याचे मला माहिती असून ते दुसऱ्यांचे नांव सांगून स्वतःकरीता रू. १,०००/-- इतक्या लाचेच्या रकमेची मागणी करीत असल्याची माझी खात्री झाली आहे.

मला क्लार्क हाटे यांना रू. १,०००/-- इतक्या रकमेची लाच देण्याची इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे दिनांक ०९.०१.२०१९ रोजी आलो. मी माझी सविस्तर तक्रार पो.नि. पठारे व सपोआ ठोंबरे यांना सांगितली व त्यांना मी माझ्या स्वहस्ताक्षरातील लेखी तक्रार दिली. माझे तक्रारीवर प्रथम दोन शासकीय पंचांमसक्ष पडताळणी करण्यात येईल असे अधिकारी यांनी मला सांगितले.

24/01/19

मला दोन शासकीय पंचांची व पोलीस पथकाची ओळख करून देवून माझा तक्रार अर्ज पंचांना वाचावयास दिला व त्यावर पंचांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या. मला करण्यात येणाऱ्या पडताळणी कारवाई संबंधी आवश्यक सुचना दिल्या

माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र. १ श्री. पवार यांचेसह प्रत्यक्ष क्लार्क हाटे यांचे कार्यालयात माझे कामाविषयी बोलणी करण्यास पाठविले. त्यावेळी क्लार्क हाटे हे कार्यालयात उपस्थित नव्हते. दिनांक १०.०१.२०१९ रोजी पडताळणी करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक १०.०१.२०१९ रोजी ला.प्र.विभाग कार्यालयात हजर झालो. त्यावेळी तेथे पंच व पोलीस पथक देखील हजर होते. मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने पुन्हा आवश्यक त्या सुचना दिल्या आणि आम्ही जे.आर.मेहता उद्यानचे समोर, जैनमंदिर जवळ, सायन हॉस्पीटल येथे पोहोचलो.

माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र.१ यांचेसह प्रत्यक्ष क्लार्क हाटे यांचे कार्यालयात माझे कामाविषयी बोलणी करण्यास पाठविले. त्यावेळी क्लार्क हाटे यांचेशी कामाविषयी चर्चा झाली त्यावेळी क्लार्क हाटे यांनी त्यांचेकडे अर्ज आला नसल्याचे सांगून अडीच वाजता भेटण्यास बोलाविले. त्यानंतर पोनि पठारे यांनी माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावल्यानंतर पंच क्र. १ यांचेसह क्लार्क हाटे यांना भेटण्यास गेलो. क्लार्क हाटे यांनी त्यांना वेळ नसल्याचे सांगून फोन करून किंवा वॉर्डातून बोलावून घेतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी माझे वार्डात कर्तव्य करीत राहीलो.

मी वॉर्डमध्ये कर्तव्यावर असताना माझे सोबत काम करणारे वॉर्डबॉय श्री. अशोक पंचराज यांनी क्लार्क हाटे यांनी बोलाविले असल्याचा निरोप दिला. मी पुन्हा सायन हॉस्पीटल बाहेर जे.आर.मेहता उद्यानचे समोर उभे असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. त्यावेळी पोनि पठारे यांनी माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंचक्र. १ यांचेसह पुन्हा क्लार्क हाटे यांना भेटण्यास पाठविले. मी क्लार्क हाटे यांना भेटलो त्यावेळी पंच क्र. १ हे दिसतील अशा अंतरावर थांबलेले होते. त्यावेळी क्लार्क हाटे यांनी माझेकडे रू. १,०००/- (एक हजार फक्त) लाचेची रकमेची मागणी करून शनिवारी स्विकारण्याचे मान्य केले. सदर बाब मी पडताळणी पथक यांना पंच क्र. २ यांचेसमक्ष सांगितली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण स्पिकर ऑन करून सर्वांनी ऐकले व त्यांची खात्री झाली की, क्लार्क हाटे यांनी लाचेची रक्कम रू. १,०००/- मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्याप्रमाणे पोनि पठारे यांनी मला दिनांक १२.०१.२०१९ रोजी लाचेच्या रकमेसह हजर राहण्यास सांगितले.

मी शनिवार दिनांक १२.०१.२०१९ रोजी ला.प्र.विभाग येथे हजर झालो. त्यावेळी तेथे दोन पंच व पोलीस हजर होते. मला लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली. मी माझेकडील रू. ५००/- मुल्याच्या दोन भारतीय चलनी नोटा किंमत रू. १,०००/- लाचेची रक्कम पोनि पठारे यांचेकडे दिली. पोनि पठारे यांनी सापळा कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचांसमक्ष अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले.

मी दिलेल्या लाचेच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावली. लाचेची रक्कम माझे शर्टाचे वरील डाव्या खिशात ठेवली व त्या त्यानंतर मी, दोन पंच व पोलीस पथक तेथून निघून सायन हॉस्पीटल जवळील जैन मंदिरचे जवळ, गेट क्र. ५ समोर येऊन थांबलो.

Rathod
24/01/19

श्री. गिरीश जगजीवन राठोड यांची दिनांक २४.०१.२०१९ रोजीची फिर्याद पुढे चालू .......

पोनि पठारे यांनी मला पुन्हा आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यावेळी माझे शर्टाच्या आतील बनयिनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र. १ यांचेसह लोकसेवक क्लार्क हाटे यांना भेटण्यास पाठविले. नमुद दिवशी मी लोकसेवक यांना भेटलो व मोबाईलवर फोन केला, परंतू लोकसेवक श्री. हाटे यांनी कामाविषयी चर्चा करून मला वॉर्डात येतो, फोन करतो, सेकंड शिफ्टला दे किंवा एक तारखेला दे असे सांगितले. मात्र लाचेची रक्कम स्विकारली नाही. माझे व हाटे यांचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण आम्ही सर्वांनी ऐकले.

पोनि पठारे यांनी त्या दिवशीची सापळा काढून घेतला व हाटे पुन्हा बोलावतील त्या वेळी सापळयाचे आयोजन करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. पडताळणी व काढून घेतलेला सापळा संबंधित सविस्तर पंचनामा करण्यात आलेले आहेत.

माझे क्लार्क हाटे (पुर्ण नांव माहित नाही) याचेशी पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत. माझा धुलाई भत्ता व घाण भत्ता मिळण्यासाठीचा अर्ज मंजूरीसाठी पुढे पाठविण्याकरीता दुसऱ्यास पैसे दयावे लागतील असे सांगून क्लार्क हाटे यांनी माझेकडे रू. १,०००/— इतक्या लाचेची स्वत:करीता मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले, म्हणून माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून तो मला हिंदीतून समजावून सांगितला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(signature) 24/01/19

(signature)

( रणजित पठारे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.